
परिवर्तनवादी साहित्य

संकल्पना आणि स्वरूप



संपादक
डॉ. रामकिशन दहिफळे

सहसंपादक
डॉ. शंकर विभुते
डॉ. संतोष देशमुख

डॉ. वासुदेव मुलाटे गौरव ग्रंथ

ISBN No. : 978-81-949714-8-1

सर्व हक्क : प्रकाशकाधीन

Pariwartanwadi Sahitya :
Sankalpana Aani Swaroop.
Editor : Dr. Ramkishan Dahiphale.

परिवर्तनवादी साहित्य :
संकल्पना आणि स्वरूप
संपादक : डॉ. रामकिशन दहिफळे

प्रकाशक :
सौ. राजश्री मुलाटे पांगरकर,
स्वरूप प्रकाशन,
५९२, नारायणपेठ, शिवशक्ती अपार्टमेंट,
केळकर रोड, कन्या शाळेजवळ,
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी : ७०२०२६३७०७

मुद्रक : रुद्रायणी ऑफसेट
सिडको, औरंगाबाद.
भ्रमणध्वनी : ९५४५४९५३६४

अक्षर जुळवणी : नीट एंटरप्रायजेस,
१४, राठी गॅलेक्सी, सिडको कॅनॉट,
औरंगाबाद. भ्रमणध्वनी : ८७८८४७५२०८

मुखपृष्ठ : सरदार जाधव

आवृत्ती : पहिली
वसुबारस १ नोव्हेंबर २०२१

मूल्य : ६०० रुपये

संपादक मंडळ

१. डॉ. शत्रुघ्न फड
२. डॉ. संजय कसाब
३. डॉ. अनिल मुंडे
४. डॉ. बाळासाहेब वाघ
५. प्रा. ज्योती स्वामी
६. डॉ. सुषमा प्रधान
७. डॉ. रामचंद्र झाडे
८. डॉ. दिवाकर संदानशिव
९. डॉ. कैलास वानखडे
१०. डॉ. मुंजाजी चोरघडे
११. डॉ. यशवंत सोनुने
१२. डॉ. विठ्ठल भानुसे
१३. प्रा. संपत पांढरपोटे
१४. प्रा. संजय मुंडे
१५. प्रा. प्रल्हाद मोरे
१६. डॉ. मोहन सौंदर्य

***

२. विनायक तुमराम, 'आदिवासी साहित्य व कला' - हाकारा (त्रैमासिक), वर्ष १, अंक १, (जानेवारी-मार्च) १९८३, पृ. ३
३. प्राचार्य राम शेवाळकर यांचा पुरस्कार - 'गोंडवन पेटले आहे' - विनायक तुमराम, प्र. आ., चंद्रपूर, १९८७
४. कुसुम नारगोळकर, वसंत नारगोळकर, जंगलचे राजे, प्र.आ., गारगोटी, १९५५, पृ. ३
५. विनायक तुमराम, 'आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाची घडण', आदिवासी संशोधन पत्रिका-खंड ६, क्र. १ बी, मार्च १९८४, पृ. ३४
६. विनायक तुमराम 'वैदर्भीय आदिवासी लेखक', स्मरणिका-३६ वे विदर्भ साहित्य संमेलन, अहेरी, २० ऑक्टोबर १९८४, पृ. ३१
७. दलितांचे विद्रोही वाङ्मय, संपादक - वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, प्र.आ., नागपूर, १९८१, पृ. ९
८. सिद्धार्थ सोनटक्के, 'वणीच्या साहित्य संमेलनाने काय दिले?', दै. लोकमत (नागपूर), दि. ३०-०५-१९८२, पृ. २
९. विनायक तुमराम, 'गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह उईके', द्वि.आ., चंद्रपूर, २०११, पृ. १३२
१०. 'आदिवासी साहित्य व कला', उनि., पृ. ३

***

२५. आदिवासी कविता आणि कादंबरी

– प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर

आदिवासी साहित्याची चर्चा करताना प्रस्तुत ठिकाणी मी आदिवासी साहित्याची संज्ञा, संकल्पनेची चर्चा करणार नाही. मराठी साहित्यातील आदिवासी साहित्याची निर्मिती विचारात घेत असताना आदिवासी कविता व आदिवासी कादंबरी या दोन वाङ्मय प्रकारातील निवडक वाटचालीचा स्थूल आढावा घेणार आहे.

आदिवासी कविता :

मराठीतील आदिवासी काव्यरचनेचा विचार करता दोन बाबी प्रथम लक्षात घ्याव्या लागतील. एक म्हणजे बिगर आदिवासी कवींचे काव्यलेखन, तर दुसरे आदिवासी कवींचे काव्यलेखन. बिगर आदिवासी कवींमध्ये म. जोतिराव फुले ते प्रा. के. एल. देशपांडे यांच्यापर्यंत एक थोर परंपरा आहे. या परंपरेत वा. ना. देशपांडे, भगवान भोईर (एक हुंदका यासाठी – १८८५), डॉ. सरिता जांभुळे (घरकुल जखमांचे –

१९९५), श्रीधर शनवारे, गोकुलदास मेश्राम (उद्ध्वस्त करायचं आहे मला - १९९३), ॲड. भगवान पाटील (न्यायचक्र - २०००), श्री. रामचंद्र मोरे (स्पंदन नभाचे - २००६), प्रा. विनोद मेश्राम यांचा (आता तरी जागे व्हा - २००२) इ. अनेक कविंनी आदिवासींचे दैन्य, दुःख, व्यथा, वेदना इ. चे चित्रण केलेले आहेत. या कविंनी आदिवासींची इतिहासातील राजे-रजवाडे यांची थोर परंपरा उजागर केली आहे. याशिवाय आदिवासींचे दैन्य आणि गुलाम, वेठबिगारी, दारिद्र्य इ. समस्या अधोरेखित केलेल्या आहेत. वरील सर्वांच्या कवितेबद्दल आदिवासी साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, 'डोकावून न्याहाळणे' वेगळे आणि 'अनुभवणे' वेगळे.[१] यातील फरक सूचित केलेला आहे. या मतातील अर्थ-गर्भ सूचकतेतून आदिवासींच्या काव्यकर्तृत्वाचा प्रारंभकाळ सुरू होतो आहे. हा महत्त्वाचा बदल डॉ. विनायक तुमराम अधोरेखित करतात. तो मला योग्य वाटतो आहे. या प्रारंभ काळाबद्दल डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''आदिवासी कविता म्हणजे आदिवासी साहित्याच्या गडाची पहिली पायरी होय. आदिवासी कविता हे आदिवासी साहित्यसृष्टीचे नक्षीदार, कोरीव व भक्कम महाद्वार आहे. आदिवासी साहित्याची अस्तित्व नोंदच मुळी कवितेने झाली.''[२]

आज तर या गडाच्या पायऱ्या फारच भक्कम झालेल्या आहेत. आज २१ व्या शतकात आदिवासी कवितेला नव धुमारे फुटत आहेत. शिक्षणाने सजग झालेला आजचा आदिवासी तरुण काव्य प्रांतात नव्याने दाखल झालेला आहे. आदिवासींचा पहिलावहिला काव्यसंग्रह 'मोहोळ' (१९८२) ते कवी अनिल साबळे यांचा 'टाहोरा' (२०१९) या प्रदीर्घ काळात आदिवासी कविता फुलत, बहरत गेली. आपल्या वेगळेपणाने या कवितेने मराठी काव्यप्रांतात वेगळे स्थान निर्माण केलेले आहेत. या प्रदीर्घ आदिवासी कवितेतून आदिवासींचा अस्मिता जागर, रानजागर होतो आहे. या कवितेतून आदिवासी क्रांतिकारकांचा थोर व समृद्धशाली, वैभवशाली इतिहास, धर्म, संस्कृती, आदिवासी समाजाच्या व्यथा, वेदना आणि विद्रोह शब्दबद्ध होतो आहे. आदिवासी कविता दलित कवितेसारखी प्रस्थापित अभिजन परंपरेला छेद देते. अन्याय, अत्याचारी, दमन,

शोषणाच्या नीतिला नकार देते. व्यवस्थेला प्रश्न विचारणारी आदिवासी कविता आहे. प्रारंभीच्या काळी सुखदेवबाबू उईके ('मेटा पुंगार अर्थात पहाडी भाग १ व २ - १९६२), भुजंग मेश्राम ('आदिवासी कविता' - १९७५), 'उलगुलान' (१९९५) इ. आपल्या कवितेबद्दल भुजंग मेश्राम म्हणतात की, ''मह्या कवतेचं चांगभलं कंदीच मनात धरणार नाही. काऊनकी, ती टाळ्या घेण्यासाठी, शब्दांची छाछूगिरी दाखविण्यासाठी नाही.''[३]

अशी ही भूमिका केवळ 'उलगुलान'कार भुजंग मेश्राम यांचीच नसून ती समस्त आदिवासी कविंची आहे. भुजंग मेश्राम यांनी गोंडी, परधानी, वऱ्हाडी, गोरमाटी इ. भाषांमधून भाषिक आविष्कार शब्दबद्ध केलेला आहे. आदिवासी कविंच्या पहिल्या पिढीतील विद्रोही कवी वाहरू सोनवणे आपल्या 'गोधड' (१९८७) मधून आदिवासींच्या अस्मिता आणि माणुसकीची लढाई मुखर करतात. 'रोडाली' हा अलीकडील त्यांचा संग्रह आहे. ते आपल्या 'गोधड', 'कविते', 'कोर्ट', 'हाका जखमांच्या', 'स्टेज', 'चळवळ' इ. काव्यरचनांतून आदिवासींचे भिलोरी भाषेतून व्यथा, वेदना, दुःख प्रकट करतात. पहिल्या पिढीतील प्रतिभावान कवी म्हणजे प्रा. डॉ. विनायक तुमराम होय. 'गोंडवन पेटले आहे' (१९८७), 'शतकातील आदिवासी कविता' (संपादन) यातील कविता अर्थगर्भ आहे. आदिवासी अस्मितेचा उठाव करणारी, परिवर्तनशील कविता आहे. 'उलगुलान'कार भुजंग मेश्राम हे डॉ. विनायक तुमराम यांच्याबद्दल अभिमानाने म्हणतात की, ''आदिवासी साहित्यामधला अत्यंत महत्त्वाचा शीर्षकवी म्हणून उल्लेख करतात.''[४]

रामचंद्र चिंतामण जंगले हे विचारवंत कवी आहेत. 'इखारलेल्या ललना' (२००६), 'धिक्कार' (१९९५), 'विरप्पा गौंडर' (२००७), 'पाऊसपाणी (२०१०) इ. संग्रह आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी अशा अनेक भाषांतून ते आदिवासींचा स्वाभिमान व इमान आविष्कृत करतात. याच परंपरेतील एक प्रतिभावंत कवी, विचारवंत म्हणजे प्रा. माधव सरकुंडे होत. 'रानपाखरांची संसद' (२००५), 'ब्लॅक इज ब्युटीफुल' (२००९), 'मनोगत' (१९९७) उपरोधिक शैलीत आदिवासींचे दुःख ते

मांडतात. आरंभीच्या पहिल्या पिढीतील मान्यवर कवींमध्ये डॉ. गोविंद गारे ('अनुभूती' - १९९४), चामूलाल राठवा ('माझी सनद कुठे आहे' - २००४), उषाकिरण 'लेखणीच्या तलवारी - कवितासंग्रह (२०११), उषा किरण आत्राम ('म्होरकी' - १९९७), ('एक झोका आनंदाचा' - २०११), प्रा. वामन शेळमाके ('जागवा मने पेटवा मशाली - १९९१), पुरुषोत्तम शेळमाके ('वणसूर्य' - १९९१), सौ. कुसुम आलाम ('रान आसवांचे तळे' - १९९७) व ('रानपाखरांची माय' - २०००), बाबाराव मडावी, विठ्ठलरूप कन्नाके इ. सर्वच कवी, कवयित्रींनी वन, जंगल, जमिनीच्या मूळ मालकाची होणारी अवहेलना, वेठबिगारी इ. चे प्रभावी चित्रण केलेले आहेत.

दुसऱ्या पिढीतील तरुण कवी म्हणजे कृष्णकुमार चांदेकर ('पतुसा' - १९९९), सुनील कुमरे ('तिरकमठा' - १९९९), वीरसिंग पाडवी, गोपाल आडे, प्रब्रह्मानंद मडावी, विनोद कुमरे, डॉ. उत्तमराव धोंगडे ('वनवासी' - १९८४), रवि कुरसंगे ('इंद्रियारण्य' - १९९०), वसंत कुलसंगे ('अस्मितादर्श' - २०००), वाल्मिक शेडमाके ('मी उद्ध्वस्त पहाटेचा शुक्रतारा' - २००१), वसंत कनाके (सक्कासकम' - २००२), गणेश परतेकी ('जगण्याचे संदर्भ' - २००३), दा. मु. सिडाम ('कारम मिरसिन' - २००४), डॉ. नरेंद्र कोडवते ('वाटा' - २००६), प्रभू राजगडकर ('येथून पुढे' - २००६), डॉ. निलकांत कुलसंगे ('आदिम सुगंधयुक्ता' - २००७), सौ. रेखा किसन डगळे ('वेडी पक्षिणी' - २००८), भुजंग मेश्राम ('अभुजमाड' - २००८), बाबाराव मडावी ('पाखरं' - २००९), तुकाराम धांडे ('वळीव' - २०१०), बी. डी. आडे ('ऋणमुक्ती' - २०१०), लक्ष्मण टोपले ('आरड गेऽऽ कुहू बाई' - २०१०), मारोती उईके ('गोंडवनातल आऊंद' - २०१०), पी. डी. आत्राम ('पहाडी हुंकार' - २०११), डॉ. विनायक तुमराम ('रानगर्भातील जखमा' - २०११), विठ्ठलराव कन्नाके 'भ्रमर रुंजन' - २०११), शंकर बळी ('ही वाट तिथून जाते' - २०११) इ. सर्वच कविंची कविता संविधान मूल्यांचा उद्घोष करते. आदिवासी अस्मिता, अस्तित्व, संघर्षाची सक्षमपणे नोंद करते. यातून आदिवासी साहित्य व आदिवासी चळवळीची

सुस्पष्ट भूमिका अधोरेखित होत आहे.

आदिवासी कवितेच्या तिसऱ्या पिढीवर जागतिकीकरणाने जो नवजागर सुरू झाला, त्याचे प्रतिबिंब अधोरेखित केले आहे. नवतंत्रज्ञान आणि आदिवासी, सर्वदूर पसरलेले शिक्षण, शिक्षणातून आलेला रानजागरातील आत्मविश्वास शब्द होत आहे. या नवीन पिढीत सक्षमपणे रानजागर करणाऱ्या कवितेमध्ये डॉ. विनोद कुमरे - 'आगाजा' (२०१४), सुनील कुमरे 'किंगरी' (२०१५), मधुचंद्र भुसारे 'आदोर' (२०१५), 'तांडा' (२०१६), 'आदिवासी हायकू' (२०१७), 'आदिवासी गझल' (२०१८), काळूराम कनोजे 'रानवाटा' (२०१७), राजू ठोकळ 'पहाडी फुलोरा' (२०१५), सीताराम कांबळे (वणवा), संजय दोबाडे (अजून किती काळ), संतोष पावरा 'ढोल' (२०१७), डॉ. हनुमंत भवारी 'सपान' (२०१३), कृष्णकांत भोजने 'आसूड', 'प्रबोधन'. किशोर डोके 'तटबंदी' (२०१८), 'गाभूड' (२०२०), 'धडामधूम' (२०२०), भावेश बागूल 'पातरी' (२०२०), 'घांगळी', अनिल साबळे 'टाहोरा' (२०१९), सखाराम डाखोरे 'रानवा' (२०१९), शीतल ढगे 'मुक्तविरा' (२०२०), देवदत्त चौधरी 'तहान' (२००९), 'झडप' (२०१४), सुरेश धनवे 'अस्वस्थ मनाचे बंड' (२०२०), सुनील गायकवाड 'पायरी' (२०१५), 'कोयता' (२०१७) मनोहर मोहरे ('गावशिवार' - २०१२), 'जगाचा पोशिंदा' (२०१३), उगवती मने (प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कवितेचे संपादन - २०१७) प्रब्रह्मानंद मडावी (आपण कोणत्या देशात राहतो) इ. कितीतरी नव्या दमाचे संवेदनशील कवी कविता लिहित आहेत. या सर्वांच्या कवितेतून जागतिकीकरण, मावळी बोली, जुन्नेरी बोली इ. बोलीभाषांतून आदिवासी जीवनाचे चित्रण साकार होते आहे. संग्रहरूपाने कविता प्रसिद्ध नसणाऱ्या कवितेमध्ये तुकाराम चौधरी, अशोक पेकारी, संतोष केंगले, मुक्ता अंभोरे, संजय साबळे इ. किती तरी कवी आहेत. कोविड १९ महामारीच्या काळात वसई येथील डॉ. सखाराम डाखोरे यांनी 'उलगुलन एक साहित्यिक चळवळ' या फेसबुक पेजद्वारे अनेक नवोदित कवींना प्रकाशात आणून काव्य, गझल, गीतवाचनाची संधी मिळाली आहे.

आदिवासी जीवनावरील कादंबरी :

आदिवासींच्या जीवनावर विविध दृष्टिकोनांतून मराठी साहित्यात कादंबरी लेखन झालेले आहेत. डॉ. विनायक तुमराम यांनी १९५० ते २००० या काळातील आदिवासी जीवनावर प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांचा आढावा घेतलेला आहे. र. वा. दिघे यांची 'सराई' (१९४३), 'पाणकळा' (१९४१), आचार्य शं. रा. भिसे यांची 'जंगलातील छाया' (१९४५), प. त्रि. सहस्त्रबुद्धे यांची 'पहिली सलामी' (१९४८), वा. ब. कर्णिक यांची 'वाडगीण' (१९५१), दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तिरावर' (१९५३), ना. रा. शेंडे यांची 'तांबडा दगड' (१९५७), वि. शं. पारगावकर यांची 'निगुडा' (१९६२), गो. नी. दांडेकर यांची 'जैत रे जैत' (१९६५), 'माचीवरला बुधा', सौ. नलिनी सहस्त्रबुद्धे यांची 'राणी दुर्गावती' (१९७५), गो. नी. दांडेकर यांची 'भिल्लवीर कालिंग', ॲड. दादा देशकर यांची 'न्यायदंड' (१९८२), महाश्वेतादेवी वर्मा यांची प्रभा श्रीनिवास यांनी मराठीत अनुवादित केलेली 'अरण्येर अधिकार' (१९८३), शरद दळवी यांची 'एकलव्य' (१९८८), दिनानाथ मनोहर यांची 'आंदोलन' (१९८८), दिनकर दाभाडे यांची 'बिलामत' (१९९४), विलास मनोहर यांची 'एका नक्षलवाद्याचा जन्म' (१९९२), ॲड. एकनाथ साळवे यांची 'एनकाऊंटर' (१९९८), दिनानाथ मनोहर यांची 'मन्वंतर' इ. कादंबरीकारांनी महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातींचे चित्रण केलेले आहेत. महाराष्ट्रातील विविध प्रदेशांत जीवन व्यथित करणाऱ्या आदिवासी जमाती, त्यांच्या समस्या, दारिद्र्य, जगण्याचे प्रश्न व या सर्वांना भिडणाऱ्या, या समस्येची सोडवणूक करणाऱ्या विविध विचारधारांच्या संघटना, संस्था यांचा भूतदयावादी, सहानुभूतीपर करुणाभाव चित्रित केलेला आहे. यात अपवाद फक्त आदिवासी चळवळीशी जीवनदायी बांधिलकी स्वीकारणारे कार्यकर्ते लेखक, कादंबरीकार आहेत.

वरील कादंबरीकाराशिवाय श्री. व्यं. केतकर, दा. गो. बोरसे, अनंत मनोहर, जगदीश गोडबोले, सुरेश वर्मा, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. शंकरराव खरात, रमेश पटवर्धन, सुरेश द्वादशीवार, मधुकर वाकोडे, बाबा भांड रामचंद्र नलावडे, वि. वा. हडप, न. चि. केळकर, श्रीराम

अत्तरदे, प्रकाश कोळवण, मंगेश विश्वासराव, नयना आचार्य, बा. स. हाटे इ. कादंबरीकारांचा नामोल्लेख टाळता येणार नाही.

वरील सर्व आदिवासीएतरांच्या कादंबरी लेखनातून साधारणपणे विविध आदिवासी जमातींमधील प्रथा, परंपरा, रूढींचे स्वरूप अधोरेखित होत आहे. अज्ञान, व्यसनाधिनता, शोषण, दारिद्र्य, अंधश्रद्धा या सर्वांचे प्राबल्य आहे. मातृसत्ताक कुटुंबसंस्था; परंतु स्त्रियांची परवड शब्दबद्ध होत आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही भडक प्रवृत्तीने भडक, अतिशयोक्ती आणि अवास्तव चित्रण केलेले आहे. आदिवासींना मुख्य समाज प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने कादंबरी लेखन झालेले आहे. आदिवासींमध्ये शिक्षणाच्या प्रसार आणि प्रचाराशिवाय सुधारणा अशक्य आहे, असा विचारव्यूह होता. अगतिकता, असहायतेतून हिंसक चळवळीकडे तो झुकला जातो आहे. स्वजातीतील लोकांच्या प्रयत्नांशिवाय उद्धार अशक्य आहे, असा विचार प्रसारित होत आहे. आदिवासींच्या बंडाचे, पराक्रमाचे, क्रांतिकारकांच्या पराक्रमाचे यशोगान, हक्कांसाठी लढा इ. विषय हाताळले गेले आहे. बाबा भांड यांच्या 'तंट्या'मधून आदिवासी नायकाची साहसकथा, भिल्ल पलटण, आदिवासींची सांस्कृतिक परंपरा – घोटुल संस्कृती, युवागृहे इ. याशिवाय 'डांगाणी' कादंबरीतील ठाकर आणि महादेव कोळी या जमातीतील ऐक्यभावना, मैत्रभाव जपला आहे. अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या 'अहिनकूल'मध्ये पारतंत्र्याच्या काळातील मातृभूमीविषयक प्रखर स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा, प्रामाणिकपणा, सावकारी जाच, कर्मकांड, लोकपरंपरा, अस्मिता, संघर्ष, वेठबिगारी, नागरीकरण इ. चे प्रभावी चित्रण केलेले आहे.

थोडक्यात कादंबरीसारख्या ललित प्रकारातून अभिव्यक्त होणारे आदिम जीवन अन्यायी, छळ, अत्याचार, भूक, दारिद्र्य, उपासमार या स्वरूपाचे आहेत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील जमीनदार, शेठ-सावकार, जंगल ठेकेदार व अधिकारी, ब्रिटीश व स्वदेशी शासन हे सर्वच आदिवासींच्या शोषक रूपात उभे राहतात.

आदिवासींचे कादंबरी लेखन :

खास आदिवासी जाणीव-नेणीवेतून 'कादंबरी' लेखन फार नगण्य

आहे. याबाबत डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''१९५० ते २००० या कालखंडात 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराशी आदिवासींनी फारकत घेतली की काय, असे वाटायला लागते.'' आदिवासी जगतातील अनेक विषय आणि घटिते डोळ्यांपुढे असतानाही सुशिक्षित व संवेदनशील आदिवासी या प्रकारापासून ढळलेले दिसतात. कदाचित कादंबरी लेखनाचे तंत्र काहीसे पेलवता न आल्याने तर असे झाले नसावे? असा डॉ. तुमराम यांचा सवाल रास्त आहे. नजुबाई गावीत, प्रा. माधव सरकुंडे, बाबाराव मडावी, डॉ. गोपाळराव गवारी इ. आदिवासी कादंबरी लेखनातील पहिली पिढी होय. या पिढीतील नजुबाई गावीत यांनी खास आदिवासी जाणीव-नेणीवेतून चित्रण केलेले आहे. त्यांनी 'तृष्णा' (१९९५, सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन, धुळे) या आत्मवृत्तपर कादंबरी लेखनातून 'आदोर', 'रोप', 'रोपणी', 'पारोळ' अशा चार विभागांतून धुळे जिल्ह्यातील 'मावची' आणि 'भिल्ल' जमातीचे वस्तुनिष्ठ चित्रण केलेले आहे. आदिवासी मावची जमात ही परिस्थिती शरणवर्तनाची शिकार बनवली जाते. ही जमात मातृपूजक असूनही मावची स्त्रियांवर अन्याय होतो. मावची स्त्री दुर्बल नवऱ्यापेक्षा अतिशय सक्षमपणे संकटांना धीराने सामोरी जाते. वैफल्यग्रस्त जीवन त्या स्वीकारत नाहीत. या कादंबरीतील इसरी असो की आशा, या दोन्ही स्त्रिया अतिशय खंबीर व सक्षमपणे जीवन पेलतात. मराठी कादंबरीतील अनन्यसाधारण स्त्री कर्तृत्वाचा मान संपादन करणाऱ्या या कादंबरीतील मायलेकींचा अंत वाचकांना संवेदनशील बनवितो. या कादंबरीबद्दल डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''जनबोलीतील शब्दांची जाणीवपूर्वक योजना करून नजुबाईंनी कादंबरीला एक 'भिलाडी साज' चढवला आहे. भिलोरी व अहिराणी भाषाचा प्रभाव धारण करणारी लोकगीते वानगीदाखल नजूबाईंनी दिलेली आहेत. श्रमनिष्ठ भिल्ल, मावच्यांच्या मनावरील आतल्या घावांची ओळख पुढारलेल्या दुनियेला करून देण्याचा नजूबाईंचा नेक इरादा निश्चितच या कादंबरीच्या रूपाने पूर्ण झाला आहे.''[६] डॉ. तुमराम यांच्या या मताचे प्रत्यंतर या कादंबरीतील आदिवासी गावे, वाड्या, वस्त्या तसेच स्त्री-पुरुषांची नावे, फडझाडे, धनधान्यांची नावे इ. वरून सहज लक्षात येते.

आदिवासी कादंबरी लेखनाच्या पहिल्या पिढीतील प्रतिभावान कादंबरीकार म्हणजे प्रा. माधव सरकुंडे होत. त्यांची प्रथम कादंबरी 'वाडा' (देवयानी प्रकाशन, १९९६, यवतमाळ) ही होय. आदिवासींमधील प्रमुख जमात 'आंध' जमातीवर बोलीभाषेतील ही कादंबरी आहे. आंधवाड्यातील आंधाचे दुःख, व्यथा, वेदनांची भिषणता या कलाकृतीतून साकार होते आहे. उदा. ''बरी आंधाडे हो! कर्ज नेतानी लाज वाट नाही, अन् देतांनी चावळ्या बावळ्या करता. तुमच्या गांडीचे बेतानं कातडे काढायला फायजे. सांग मादरचोदा कव्हा वापस करतू मव्हं कर्ज?'' सावकारी आणि पाटीलकीचे पाश तोडण्यासाठी या कादंबरीतील बंडखोर विचारांचा प्रतिनिधी बाजा प्रयत्नशील आहे. या कादंबरीतील बाजा म्हणतो की, ''हो आबा आपुन गरीब हावं, हे मान्य हाय. पण गरीबावं कायीबी आन्याव करावं हे कोण्या देवानं ग्यान दिलं.'' असा सडेतोड प्रश्न बाजा विचारतो. या कादंबरीबद्दल डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''आंधांना न्याय देणारी, त्यांना संघर्षास सिद्ध करणारी आणि त्यांचे मुकेपण घालवून बोलते करण्याची किमया करणारी कादंबरी लिहून एका नव्या परिवर्तन पर्वाचा शुभारंभ प्रा. सरकुंडे यांनी केला आहे.''[७] असा एका नव्या ऊर्मीचा, आदिवासी समाजावरील अन्याय-अत्याचार निर्मूलनाचा क्रांतिकारी आशावाद कादंबरीकाराने व्यक्त केलेला आहे.

आदिवासी कादंबरी लेखनाच्या पहिल्या पिढीतील ज्येष्ठ कादंबरीकार म्हणजे बाबाराव मडावी हे होत. त्यांची 'टाहो' (प्रियंका प्रकाशन, यवतमाळ, १९९८) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. सावकार, जमीनदार यांच्याकडून होणाऱ्या शोषणाचं चित्रण बाबाराव मडावी यांनी केलेले आहे. या कादंबरीचा सुशिक्षित नायक 'भिमा' हा आदिवासींवरील होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात उभा राहतो. आदिवासींच्या अस्तित्व आणि अस्मितेसाठी तो संघर्ष करतो. या कादंबरीचा नायक म्हणतो की, ''हे सारं बंद करा. तुम्ही अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन किती दिवस असलं जगणार आहात...? तंत्र मंत्र काहीही नाही.'' अशा विज्ञाननिष्ठ विचारांचा स्वीकार करावा, हे तो बजावून सांगतो. शिक्षण, संघर्ष, प्रबोधन या

त्रिसूत्रीचा अवलंब केला पाहिजे. यासाठी या कादंबरीचा नायक प्रयत्नशील आहे. या कादंबरीच्या वास्तव चित्रणाबद्दल स्वतः कादंबरीकाराने मनोगतात म्हटले आहे की, ''या कादंबरीतील पात्र-स्थळ हे काल्पनिक असले तरी त्यातील घटना मात्र सत्य वाटतात, हे या कादंबरीचं यश मला वाटतं.''

आदिवासी कादंबरी लेखनाच्या दुसऱ्या पिढीतील कादंबरीकार म्हणजे डॉ. गोपाळ गवारी, डॉ. कृष्णा भवारी, सुनील गायकवाड, संजय लोहकरे, देवदत्त चौधरी, तुकाराम चौधरी, वसंत कन्नाळे, रामराजे आत्राम, डॉ. विनोद कुमरे, डॉ. जयश्री गावीत, भास्कर भोसले इ. नव्या दमाचे कादंबरीकार आदिवासी समाजाचे जीवन कादंबरी लेखनातून चित्रित करत आहेत.

वरील कादंबरीकारांपैकी प्रा. वसंत कनाके यांनी क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या जीवनचरित्राचा परिचय नव्या पिढीला व्हावा म्हणून ''क्रांतिवीर शामादादा कोलाम : आदि स्वातंत्र्य समर'' (२०१५) ही जीवन चरित्रात्मक कादंबरी लिहिली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासी समाजाला सावकार, जमीनदार, मालगुजार, पुरोहित इ. च्या जुलमी जाचातून, मुक्त करून इंग्रज समर्थक निजामी राजवटीला हादरून सोडणाऱ्या जननायक शामादादा कोलाम यांच्या संघर्षशील जीवनाचा एक पट कादंबरीकाराने उभा केलेला आहे.

वरील कांदंबरीकारांमध्ये नव्या दमाचे तरुण कादंबरीकार म्हणजे डॉ. कृष्णा भवारी हे होत. आज जागतिकीकरणाच्या काळात सरकार दरबारी ठाण मांडून बसलेले दलाल, अधिकारी, त्यांच्याशी हातमिळवणी केलेले ठेकेदार, भांडवलदार, कंपनी मालक, राजकारणी यांच्या माध्यमांतून आदिवासींच्या विस्थापनाची जोरदार तयारी करीत आहेत. दुसऱ्या बाजूला देव, धर्माची सक्ती केली जात आहे. या सर्व परिस्थितीचे वास्तवदर्शन डॉ. कृष्णा भवारी यांच्या 'इंधोस' (चेतक बुक्स प्रकाशन, पुणे, द्वि. आ. १५ ऑगस्ट २०१८) या कादंबरीतून लक्षात येते. आदिवासींचा जीवनसंघर्ष, त्यांची आदिम संस्कृती, आंबेगाव तालुक्यातील मावळी बोलीभाषा हे या कादंबरीचं सामर्थ्य आहे. या कादंबरीचं कथानक

बेगडेवाडी या आदिवासी गावात घडतं. याशिवाय पंचक्रोशीतील मिराशी, नागूवाडी, खतारवाडी, करपूड, सावर्डा, परगणा, सांबर अशा गावांचेही भौगोलिक संदर्भ या कादंबरीच्या कथानकात आहे. कादंबरीत पांडुरंग बेगडे, त्याची बायको हौशाबाई, त्याची मुले बाळू, धोंडू, बेगडेवाडीचा मंगाजी पाटील, त्याची बायको ढवळी, त्याची व्यक्तिरेखा असल्या तरी इतरही अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत आहे. आदिवासींच्या जगण्याची साधने, शिकारीची हत्यारे, देव, धर्म, पूजा, विधी, लग्नकार्य, गाणी, गीते, सण, उत्सव, प्रथा, परंपरा इ. सर्वांचेच अत्यंत वस्तुनिष्ठ चित्रण कादंबरीकाराने घडविले आहे. जंगलातील प्राण्यांना अभय देण्यासाठी सरकारने जमीन अधिग्रहण कायदा लागू केला आहे. प्राण्यांना अभय देऊन जंगलाची वाढ झाली पाहिजे, हा सरकारचा इरादा आहे. अभयारण्यासाठी आदिवासींचे विस्थापन होणार यामुळे आदिवासी समाज भयभयीत झालेला आहे. गाव, घरे, दारे, जमीनजुमला, कुटुंब, नातेवाईक या सर्वांपासून आदिवासी दुरावणार आहे. याबद्दलचे जळजळीत अनुभव लेखकाने रेखाटले आहे. आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. सखाराम डाखोरे म्हणतात की, ''इंधोस कादंबरीतून आजच्या आदिवासींच्या जगण्यातील वास्तव अधोरेखित केले आहे. सरकार, सावकार, जमीनदार, ठेकेदार, अधिकारी, व्यापारी, दलाल यांच्या कचाट्यात सापडलेल्या, सरकारी योजनांच्या जाळ्यात अडकलेल्या व आपले आदिमपण, आपला आदिवासी धर्म, निसर्गधर्म जोपासू पाहणाऱ्या निरागस माणसांच्या जगण्याची ससेहोलपट 'इंधोस'च्या अंतरंगात शब्दबद्ध झाली आहे.''[८]

सुनील गायकवाड आपल्या 'मासोली' (२०२१) या कादंबरीतून आदिवासी स्त्रीचे संघर्षशील जीवन चित्रित करतात. या कादंबरीबद्दल प्राचार्य डॉ. गोविंद गायकी म्हणतात की, ''लेखकाच्या या कादंबरीतील निवेदनाची सहजता आणि प्रांजळपणा पात्रानुरूप भाषाशैली हे लेखकाचे सिद्धहस्त सामर्थ्य आहे. आदिवासी स्त्री जाणिवेचा विषय मनाचा ठाव घेणारा असून आत्मचिंतन करायला लावणारा आहे. लेखकाने आपल्या आदिवासी मूल्यजाणिवांशी प्रामाणिक राहून या कादंबरीचे लेखन केले असून साहित्य क्षेत्रात ती मैलाचा दगड ठरणारी राहील, यात शंका

नाही.''[९] खास आदिवासी जाणीव-नेणीवेतून लिहिलेली ही कादंबरी आहे.

या लेखाच्या मर्यादेचे भान राखून काही निवडक कादंबरीकारांच्या कादंबरीविषयी चर्चा केलेली आहे. काही सन्माननीय कादंबरीकारांच्या कादंबऱ्या उपलब्ध न झाल्याने त्यांच्या कादंबरी लेखनाचा फक्त उल्लेख केलेला आहे. याही पुढील काळात अद्ययावत कवी व कादंबरीकारांची माहिती संकलन करण्याचे कार्य सतत चालूच आहे. यानंतरच्या लेखनात सर्वसमावेशक कवी व कादंबरीकारांच्या लेखनाचे समालोचन करता येईल.

संदर्भ ग्रंथ :

१) आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन, डॉ. विनायक तुमराम, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १५ नोव्हेंबर २०१२, पृ. ३८
२) पूर्वोक्त, पृ. ३८
३) पूर्वोक्त, पृ. ४७
४) पूर्वोक्त, पृ. ५१
५) पूर्वोक्त, पृ. १४४
६) पूर्वोक्त, पृ. १४६
७) पूर्वोक्त, पृ. १४९
८) ग्रंथपरीक्षण, डॉ. सखाराम डाखोरे, चौफेर संघर्ष, शनिवार, दि. ९/२/२०१९
९) डॉ. गोविंद गायकी, सुनील गायकवाड यांच्या 'मासोली' कादंबरीचे मलपृष्ठ, ऑक्टोबर २०२१

***